परिशिष्ट 'अ'

# उद्धव शेळके यांची मुलाखत

दि. १४ जानेवारी, १९९१

१) आपला जन्म केव्हा व कोठे झाला?

माझा जन्म ८ ऑक्टोबर, १९३१ रोजी हिंगणघाट (जि. वर्धा) येथे माझ्या आजोळी झाला.

२) आपले मूळ गाव कोणते? म्हणजे वडिलांचे गाव?

माझे मूळ गाव अमरावती जिल्हयातील तळेगांव (ठाकूर)

३) आपले बालपण कोठे व कसे गेले?

माझ्या बालपणीचा बहुतांश काळ हिंगणघाटला गेला. काही काळ तळेगावला. माझे आई—वडील मधून—मधून विभक्त होत असत. त्यामुळे मामाकडे आई राहायची. मीही आईकडे असायचो. काही काळ मात्र तळेगावला राहिलो.

४) आपले शिक्षण किती व कोठे झाले?

मी मॅट्रीक पर्यंत शिक्षण घेतले, माझे प्राथमिक शिक्षण हिंगणघाट व तळेगावला झाले. आणि ५ वी पासून १० वी पास होईपर्यंत मी अमरावतीला शिकलो.

५) अमरावतीला कसे काय आलात?

माझे वडील शिवणकाम करण्यासाठी अमरावतीला आले. कारण घरात आर्थिक ओढाताण होती. तळेगाव लहान गाव असल्यामुळे वडिलांना पुरेसे काम मिळत नसे.

त्यामुळे त्यांनी अमरावतीला स्थालांतर केले. त्यांच्यासोबत आम्हीही अमरावतीला आलो. त्यामुळे मॅट्रीक पर्यंत येथेच शिकलो.

६) मॅट्रीक नंतर शिक्षणाची इच्छा नव्हती की आणखी काही कारणाने पुढचे शिक्षण घेतले नाही?

पुढील शिक्षण घेण्याची इच्छा तर खूप होती. परंतु मी शिक्षण सोडून चार पैसे कमवावेत असे वडिलांना वाटायाचे. त्यांनी तसा आग्रहच धरला. पुढील शिक्षणावर खर्च करणे त्यांच्या ऐपतीबाहेर होते. आर्थिक चणचण असल्यामुळे मी शिक्षणाचा नाद सोडला?

७) त्यानंतर काय केले? नोकरी वगैरे ?

होय, मी अमरावती येथे छापखान्यात जुळारी म्हणून कामाला लागलो. हे काम बरेच दिवस व बऱ्याच ठिकाणी (छापखान्यात) केले.

८) या व्यवसायातून कसे बाहेर पडलात व नंतर काय केले?

माझ्या वडिलांचा एक मित्र पेंटर होता. मलाही चित्रकलेची आवड असल्यामुळे मी पेंटींग शिकण्यासाठी त्याच्या सोबत मोझरीला गेलो. यावेळी छापखान्यातील नोकरी सोडली. काही दिवस मोझरीला पेंटींग कामात मदत करीत होतो. या पेंटरला लेखनाची आवड होती. एक दिवस त्याने स्वत: लिहिलेली एक कथा मला वाचून दाखविली. आम्ही एकाच खोलीत राहत असल्यामुळे, आवडीही एकच असल्यामुळे माझे त्यांचे खूप पटायचे. आपणही कथा लिहून बघावी असे मला वाटू लागले. माझ्या आजच्या तर्काप्रमाणे त्याच वेळी माझ्या मनात लेखनाचे बीज पेरले गेले.

९) त्यानंतर आपण लगेच लिखणास सुरुवात केली का?

नाही. त्यावेळी फक्त 'लिहावे' अशी इच्छा उत्पन्न झाली. प्रत्यक्ष लिखाण मात्र मी नंतर केले.

१०) ते केव्हा व कसे?

मी मोझरीवरून अमरावतीला परत आल्यानंतर छापखान्यात काम करू लागलो. यावेळी माझ्या सोबत काम करणारे एक मित्र श्री. श्याम टोकेकर याला वाचनाची आवड होती. तो आणि मी मिळून पुस्तके आणायचो, वाचायचो. या काळात भरपूर वाचन केले. या सोबतच एक वेगळा छंद मला जडला. तो म्हणजे कोडी सोडविण्याचा त्यात मला बरेचदा बक्षिसेही मिळाली.

एक दिवस मला घरून निरोप आला की, आई विहिरीवरून पाय घसरून पडली हा निरोप मिळाला तेव्हा अनेक शंका निर्माण झाल्या. नकळत एक प्रश्न मनात डोकावला. आई मरण पावली तर या बक्षिसाच काय करायचं? हा प्रश्न मनात घोळत राहिला. पुढे हाच धागा 'स्मारक' ही कथा लिहिली.

११) ती प्रथम कोठे प्रसिद्ध झाली?

ती 'यशवंत' मासिकाने प्रसिद्ध केली. आणि मासिकाचे संपादक श्री. गो. वि.पाध्ये यांचे एक प्रोत्साहनपर पत्र आले त्यामुळे फार बरं वाटलं.

१२) यानंतर आपण नोकरी सोडून लेखन केलं की छापखान्यात काम करीत असतांना लिहीत राहिलात?

काही दिवस मी छापखान्यात काम करीत होतो. फारसं लिखाण केलं नाही. पण नंतर मला अमरावती येथील दै. हिंदुस्थान या वृत्तपत्रात सह–संपादक म्हणून नोकरी लागली. तेथे मी २ वर्षे काम केलं. या काळात भरपूर लेखन केलं.

१३) तो काळ कोणता?

१९५५ ते १९५७ चा असेल.

१४) या काळातील विशेष लेखन कोणते?

या काळात मी अनेक कथा लिहिल्या. श्याम टोकेकर, मधुकर केचे या मित्रांच्या आग्रहावरुन मी सत्यकथेला कथा पाठविली. खूप दिवसानंतर ती 'सत्यकथे'त छापून आली.

१५) त्या कथेचं नांव?

'माय' हे त्या कथेचं नांव. त्यानंतर मी सत्यकथेस कथा पाठवू लागलो. त्यापासून थोडी आर्थिक मिळकत व भरपूर प्रसिद्धी मिळाली.

१६) आपला आवडता वाङ्मय प्रकार कोणता? का?

माझा आवडता वाङ्मय–प्रकार म्हणजे कादंबरी. कारण माझा स्पॅन (आवाका) मोठा आहे. कथेसारख्या मर्यादित प्रकारात तो वापरणे शक्य नव्हते. आणि माझा स्वभावही

गोष्टी वेल्हाळ. त्यामुळे माझे कादंबरीशी अधिक जवळचे नाते निर्माण झाले. त्यात मला अधिक समाधान लाभते.

१७) आपली पहिली कादंबरी कोणती?

'नांदतं घर'

१८) मराठी कादंबरीत 'मानाचे पान' म्हणावे अशी 'धग' लिहिण्याची प्रेरणा कशी मिळाली?

मी 'सत्यकथे'त प्रथम ग्रामीण कथा लिहित होतो. त्यांना वाचक–समीक्षकांकडून भरपूर प्रतिसाद मिळाला हेच ग्रामीण जीवन विस्ताराने व सखोलपणे उभे करण्यासाठी मी 'धग' लिहावयास घेतली. आणि तुम्ही 'मानाचं पान' वगैरे म्हणता ते आज लोकांनी तिचे गुण गाईले ती प्रसिद्ध झाल्यावर. परंतु प्रसिद्धी पूर्वी मला किती यातना भोगाव्या लागल्या?

१९) त्या जरा विस्ताराने सांगाल का?

मी ती कादंबरी प्रथम 'मौजे'ला समोर ठेवून लिहीत होतो. पूर्ण झाल्यावर प्रकाशकाकडे नेली तेव्हा अनेक सूचना करून दुरुस्त्या कारण्यास त्यांनी भाग पाडलं. एवढे करूनही शेवटी त्यांनी ती प्रसिद्ध न करता हस्तलिखित परत केले. मी अगदी हताश झालो होतो. पण या काळात माझे एक पत्रमित्र मुंबईचे श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी मला खूप धीर दिला. आणि ते मला पॉप्युलर प्रकाशनचे श्री. रामदास भटकळ यांच्याकडे घेऊन गेले. मागील अनुभवामुळे हस्तलिखित भटकळांपुढे ठेवल्यावर मी बोलून गेलो की, 'या कादंबरीस जर एखादंही बक्षिस/पारितोपिक मिळालं नाही तर मी मानधन घेणार नाही'. ती भटकळांनी ठेवून घेतली. १९६० मध्ये प्रसिद्ध झाल्यावर कसे स्वागत झाले हे तुम्ही जाणताच.

२०) 'धग' ला मिळालेलं महाराष्ट्र शासनाचं दुसरं पारितोषिक हे आपलं मोठं पारितोषिक आहे काय?

नाही. त्यापूर्वी माझ्या 'शिळान ...' ला १९५९ मध्ये कथेसाठी असलेलं महाराष्ट्र शासनाचं पारितोपिक गंगाधर गाडगीळ यांना आणि मला विभागून मिळालं.

२१) कुष्ठरोग्यासारख्यांच्या उपेक्षित जीवनावर कादंबरी लिहिण्यास आपण कसे प्रवृत्त झालांत?

मी दै. हिंदुस्थान मध्ये असताना 'तपोवन' या कुष्ठधामाचे निर्माते श्री. दाजीसाहेब पटवर्धन यांच्याकडे श्री. उदापुरे यांनी माझे नांव ठेवले. तेथील मुद्राणलयात व्यवस्थापक

हवा होता. ते काम मी स्वीकारले आणि तपोवन मधील 'सुभाष मुद्रणालया'त ९–१० वर्षे नोकरी केली. या वास्तव्यात कुष्ठरोग्याचं जीवन मला अगदी जवळून पहावयास मिळालं. लेखक या नात्याने ते साहित्यात आणलं.

२२) तपोवन मधील नोकरी का सोडली?

साधारणत: १९५७ ते १९६६–६७ पर्यंत मी तेथे होतो. या काळात माझ्या बऱ्याच कथा–कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या होत्या. यावेळी माझ्या मनात वाङ्मयीन मासिक काढण्याची इच्छा उत्पन्न झाली मी तपोवन मध्ये नोकरीचा राजीनामा दिला. आणि एका मित्राला भागीदार घेऊन 'वैशिष्ट्य' नावाचं मासिक काढलं. तीन–चार अंक निघाले पण नंतर प्रतिसाद नसल्यामुळे ते बंद पडलं. त्यामुळे कर्ज झालं. हे कर्ज फेडण्यास भागिदाराने नकार दिला. मी घरातील वस्तू, दागिणे विकून कर्ज फेडलं. आणि मुंबईला गेलो.

२३) मुंबईला कशासाठी?

भाग्य आजमावण्यासाठी का म्हणाना! तेथे लेखन करून चार पैसे अधिकचे मिळविता येतील असं वाटलं होतं. पण मुंबईत काही होऊ शकले नाही. त्यामुळे माझे एक मित्र पुरुषोत्तम धाक्रस हे मला 'सोबत'कार श्री. ग. वा. बेहरे यांचेकडे पुण्याला घेऊन गेले. तेथे बेहरे यांनी १०० रु. महिना देऊ केला. आणि 'लाईट' लिहिण्याचा सल्ला दिला. मला पैशाची सक्त गरज होती. तो सल्ला मी मान्य केला. आणि रम्यकथा प्रकाशनचे श्री. वासुदेव मेहंदळे यांच्याशी झालेल्या कराराप्रमाणे मी दरमहा तीन कादंबरिका लिहू लागलो. त्याचे मला दरमहा ९०० रु. त्यावेळी मिळायचे.

२४) हे 'हलके' फुलके लिखाण आपण केव्हा बंद केले ?

हे लिखाण मी दीडेक वर्ष केले असेल. मी पूर्णत: लेखनावर जगणारा लेखक. बिकट आर्थिक परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी पूण्याला गेल्यावर मी हलकंफुलकं लेखण केलं. त्यातून मला भरपूर पैसा मिळाला. आर्थिक सोडवणुकीसाठी मनाविरुद्ध करावी लागणारी ती एक तडजोड होती. या लिखाणाचा मलाही कंटाळा आला होता आणि जवळचे मित्रही बाहेर पडण्यास सुचवीत होते. दरम्यान मला पैसाही मिळाला होता.

२५) हे लिखाण बंद केल्यावर आपण काय केले ?

योगायोगाने याच दरम्यान मला 'पाठयपुस्तक मंडळात' नोकरी मिळाली. पुण्याचे एक मित्र प्रसिद्ध कथाकार श्री. शंकर पाटील यांनी महाराष्ट्राचे तात्कालीन शिक्षणमंत्री श्री.

मधुकरराव चौधरी यांचेकडे शिफारस केल्यामूळे मला 'किशोर' मासिकांचे संपादक पद मिळाले. जवळ–जवळ पाच वर्षे मी ही नोकरी केली.

२६) चांगला मान व पगार मिळत असताना आपण ही नोकरी का सोडली ?
तेथे त्यावेळी माझ्यावर अन्याय झाला. माझी पदोन्नती डावलली. त्यामुळे उदासीनता आली आणि प्रकृतीही ठीक राहत नव्हती. त्यामुळे राजिनामा दिला.

२७) या काळात लेखन ?

पुण्याला असताना जो कलंक लागला होता तो पुसून काढण्याचा प्रयत्न 'अनौरस', 'लेडिज होस्टेल', 'साहेब' द्वारे केला.

२८) यानंतर आणखी कोठे नोकरी केली का ?

नाही. मुंबईवरुन मी पुण्याला गेलो. माझे कुटुंब तेथेच होते. येथे मी निव्वळ लेखण केलं. 'डाळिंबाचे दाणे' ही कादंबरी याचवेळी मी लिहिली. दोन–अडीच वर्षे पुण्याला राहिल्यावर मी अमरावतीला परत आलो.

२९) का ? पुण्यासारखं साहित्यिकांचं माहेरघर का सोडलं ?

(या वेळी त्यांना खूप काही बोलायचं आहे असं त्यांच्या चर्येवरुन जाणवलं. पण ते एवढेच म्हणाले)

पुणेरी संस्कृती वाटते तेवढी सुसंस्कत नाही. तेथील अनुभवानंतर वऱ्हाडचं महत्त्व जाणवलं. त्यामुळे आम्ही अमरावतीला परत आलो. तेव्हापासून येथेच आहे.

३०) एकेकाळी 'अश्लील लेखक' म्हणून आपल्यावर टीका करण्यात आली. याबाबत आपली प्रतिक्रिया काय ?

हे बघा, मानवी जीवनात आहे तेवढी अश्लीलता मी मानतो.

३१) शेवटी, आपले यापुढील संकल्प ?

अनेक आहेत. त्यापैकी महत्त्वाचा म्हणजे, आजच्या समाजजीवनातील अनेक ज्वलंत समस्यांचे मूळ मला राजकारणात दिसते. जातीय दंगली, हिंसाचार, दहशतवाद, फुटीरता यामुळे मानवी जीवन ढवळून निघाले आहे. लोकशाही असल्यामुळे या सर्व बाबींचा राजकारणाशी संबंध आहे असे मला वाटते. याचा शोध घेण्यासाठी एखादी राजकीय

कादंबरी लिहावी अशी इच्छा आहे. हा शोध वास्तव पातळीवर घ्यावयाचा असल्यामुळे पार्लमेंट मध्ये वावरणे व समाजातील काही क्षेत्रांचे प्रत्यक्ष निरीक्षण आवश्यक आहे. परंतु प्रकृती ठीक नसल्यामुळे एवढी धावपळ शक्य होते की नाही, हे काळच ठरवेल.

अमरावती.
दि. १४ जानेवारी, १९९१

उद्धव ज. शेळके
भूमिपुत्र कॉलनी,नवकॉंग्रेस नगर,
अमरावती.

# परिशिष्ट 'ब'

# उद्धव शेळके यांची वाङ्मय–संपदा

## कादंबरी

### स्वतंत्र कादंबऱ्या

अगतिका, अनौरस, असा उधळतो डाव, असे हे, असे हे, आडवाट, कोवळीक, खंजरीचे बोल, गर्विता, गुडबाय बॉम्बे, गेला तिच्या वंशा, जायबंदी, डार्करूम, डाळिंबाचे दाणे, देवदासी, दाह, धग, धुंदी, नागीण, नांदतं घर, बाईविना बुवा, बाप, भोग, महापाप, महामार्ग, म्हणून, मिन मिन खाशा, येणार आली अन् गेली, येथे जिद्द संपते, रग, लालदिवा, लेडीज होस्टेल, वळणावरचं वय, शव आले ज्याच्या दारी, सौदा, सुनंदा/उर्फ, हरवले ते.., हव्यास, ऋणांकिता.

### चरित्रात्मक कादंबऱ्या

खंजरीचे बोल, साहेब, मन:पूत.

### भाषांतरीत व रूपांतरीत

अपघात, अभंगप्रीती, आणीबाणी, आस्तिक, उशीर होता तर, कर्णफुले, कुणी पाहील ना?, घर, चमत्कारिक मुलगी, तीन भावंडे, दाद, दापत्यातील दुवा, ध्यास, नर्तकीचा नाच, नवी आई, पुर्ती, पैसा, प्रीतीची नशा, प्रक्षोभ, फटाका, बेला, माडीवाली, मॉडेल, मात, मीलन, मेहुणी, मोहना, वर पाहिजे, वासना, विचित्र प्रियकर, विजूचा संसार, शरयू, सदाफुली, सुखाची सीमा, संशयाचं वारं.

## कथा संग्रह

आसरा, उमलली कळी, कडुनिंबाची सावली, कथावली, किल्ली हरवते तेव्हा, गरिबाघरची लेक, घुसळण, बाबला, बिंदिया, वानगी, शिळान, संसार संसर्ग, हिरवी झुळूक.

## बालसाहित्य

इंद्रधनुवर स्वारी, चार इंचाचा माणूस, जंगलाला लागली आग, गुरुवर्य गजाभाऊ, ऊलूचा रेनकोट, लंबू आणि बुटक्या, हावराबाईचा हव्यास.

## वैचारिक लेख

उद्धव उवाच, वैचारिक आणि व्यावहारिक, माझी दृष्टी माझी सृष्टी, दिसतं तसं नसतं.

## नाटके (अप्रकाशित)

सूनबाई परत येते, पौरुष, मिस नंदा म्हात्रे, अनौरस.

## इतर योगदान

'धग' वर आधीरीत नाटक 'पोहा चाल्ला महादेवा', लेखक– प्रवीण बर्दापूरकर, याला १९८२ प्रादेशिक व राष्ट्रीय पातळीवर प्रथम पारितोपिक

शेळक्यांनी 'माणुसकी' या चित्रपटासाठी संवाद लेखन केले.

'डाळिंबाचे दाणे' या कादंबरीवर 'रान पाखरं' हा मराठी चित्रपट काढण्यात आला.

# संदर्भ सूची

## आधारभूत कादंबऱ्या


१ शेळके उद्धव, 'नांदतं घर' (१९५७), कुळकर्णी ग्रंथागार पुणे, दु. आ. १९६४

२ शेळके उद्धव, 'धग' (१९६०), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ति. आ.१९८३

३ शेळके उद्धव, 'अगतिका' (१९६२), पुष्पक प्रकाशन, पुणे, दु.आ. १९७६

४ शेळके उद्धव, 'बाईविना बुवा '(१९६३),पॉप्युलर प्रकाशन मुंबई ,दु.आ. १९७८

५ शेळके उद्धव, 'गर्विता' (१९६७), मेनका प्रकाशन, पुणे, १९६७

६ शेळके उद्धव, 'धुंदी' (१९६७), कल्पणे प्रकाशण, पुणे, १९६७

७ शेळके उद्धव, 'वळणवरचं वय' (१९६७), ललित वैभव प्रकाश्न, पुणे १९६७

८ शेळके उद्धव, 'सौदा' (१९६७), रम्यकथा प्रकाशन, पुणे, १९६७

९ शेळके उद्धव,'हरवले ते....' (१९६७), कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, सप्टे. १९६७

१० शेळके उद्धव, 'दाह' (१९६८), दत्त प्रकाशन, पुणे, १९६८

११ शेळके उद्धव, 'कोवळिक' (१९६९), किर्लोस्कर प्रेस प्रकाशन, पुणे, नोव्हें. १९६९

१२ शेळके उद्धव, 'रग' (१९७०), रम्यकथा प्रकाशन, पुणे, जुलै १९७०

१३ शेळके उद्धव, 'देवदासी' (१९७०), रम्यकथा प्रकाशन, पुणे, जुलै १९७०

१४ शेळके उद्धव, 'आग' (१९७१), अस्मिता प्रकाशन, पुणे, जाने. १९७१

१५ शेळके उद्धव, 'लेडीज होस्टेल' (१९७३), अनुपम प्रकाशन, पुणे, १९७३

१६ शेळके उद्धव, 'अनौरस' (१९७४), पुष्पक प्रकाशन, पुणे, १९७४

१७ शेळके उद्धव, 'आडवाट' (१९७६), सरिता प्रकाशन, पुणे, जुलै १९७६

१८ शेळके उद्धव, 'डाळिंबाचे दाणे' (१९७७), सरस साहित्य, पुणे, १९७७

१९ शेळके उद्धव, 'गेला तिच्या वंशा' (१९७८), अस्मिता प्रकाशन, पुणे, मार्च १९७८

२० शेळके उद्धव, 'ऋणांकिता' (१९७८), सरस प्रकाशन, पुणे,

२१ शेळके उद्धव, 'सुनंदा/उर्फ' (१९७८), अनुपम प्रकाशन, पुणे, १९७८

२२ शेळके उद्धव, 'नागीण' (१९७८), सरस साहित्य प्रकाशन, पुणे, १९७८

२३ शेळके उद्धव, 'हव्यास' (१९७९), भगवानदास हिरजी प्रकाशन, मुंबई, ऑग. १९७९

२४ शेळके उद्धव, 'महापाप' (१९८०), भगवानदास हिरजी प्रकाशन, मुंबई, १९८०

२५ शेळके उद्धव, 'म्हणून' (१९८०), सरस साहित्य प्रकाशन, पुणे, १९८०

२६ शेळके उद्धव, 'बाप' (१९८१), सरस साहित्य, अमरावती, ऑग. १९८१

२७ शेळके उद्धव, 'डार्क रूम' (१९८१), परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८१

२८ शेळके उद्धव, 'जायबंदी' (१९८३), सरस साहित्य प्रकाशन, पुणे, १९८३

२९ शेळके उद्धव, 'लाल दिवा' (१९८३), सन पब्लिकेशन, पुणे, १९८३

३० शेळके उद्धव, 'महामार्ग' (१९९२), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई , १९९२

# संदर्भ सूची

## संदर्भ ग्रंथ


### इंग्रजी

1 Allan Walter, 'Reading the Novel', Phonix House, London, 1956
2 Forster E. M., 'Aspect of the Novel' Reprint, London, 1970
3 Hadson W. H., 'An Introduction to the study of Literature', London, 1958
4 Reeve Clara, 'The progress of Romance',

### हिन्दी

१. गुलाबराय बाबू, 'काव्य के रूप', आत्माराम एन्ड सन्स, दिल्ली, १९७०
२. गुप्त शांतिस्वरूप, 'हिन्दी तथा मराठी उपन्यासोंका तुलनात्मक अध्ययन', एस. चॉद एन्ड
३. जोशी इंदिरा, 'हिन्दी आंचलीक उपन्यास', देवनागर प्रकाशन, जयपूर १९८५
४. पालीवाल बी. एम., अनुवाद– 'साहित्य सिद्धान्त', लोकभारती प्रकाशन, इलाहाबाद
५. प्रेमचंद, 'कुछ विचार', १९६५
६. सारडा निर्मला, बच्चन के साहित्य का मनोवैज्ञानिक अध्ययन', ग्रंथविशेप प्रकाशन, सातारा, १९९४

### मराठी

१. कुरुदकर नरहर, 'धार आणि काठ', देशमुख आणि कंपनी, पुणे, दु. आ. १९९०
२. कुळकर्णी अनिरुद्ध, (प्रकाशित), 'प्रदक्षिणा' (भाग पहिला), कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती, १९८०
३. कुळकर्णी अनिरुद्ध, (प्रका.) प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९९१
४. कुळकर्णी द. भि., 'तिसऱ्यांदा रणांगण', विजय प्रकाशन, नागपूर, १९७६
५. कुळकर्णी मदन, 'मराठी प्रादेशिक कादबरी : तंत्र आणि स्वरूप', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८४
६. कुळकर्णी वा. ल., 'वाङ्मयातील वादस्थळे', स्वस्तिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९४६

७. कुळकर्णी वा. ल., 'साहित्य : शोध आणि बोध', पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि. मुंबई, दु. आ. १९९५
८. कुळकर्णी श्री. मा., 'कादंबरीची रचना', उन्मेष प्रकाशन, नागपूर, १९५६
९. कुळकर्णी श्री. मा., 'कादंबरी समीक्षा', उन्मेष प्रकाशन, नागपूर, १९७२
१०. गाडगीळ गंगाधर, 'खडक आणि पाणी', उत्कर्ष प्रकाशन, पुणे ति. आ. १९८५
११. जोग ल. ग., 'कादंबरी', चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, १९६३
१२. जोशी अचला, 'हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या', मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, १९७५
१३. दांडेकर मालती, 'मराठी कादंबरीतील अष्टनायिका', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६१
१४. देशपांडे अ. ना., 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाग १, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९५४
१५. देशपांडे अ. ना., 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण १९७९,
१६. देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', भाग १, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, १९५३
१७. देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', भाग २, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, १९५४
१८. देशपांडे मा. का., 'माडखोलकर– वाङ्गय आणि व्यक्तिमत्त्व', दि महाराष्ट्र ग्रंथभांडार मुंबई, १९४८
१९. देशपांडे मा. का., 'साहित्य साधना', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६१
२०. पवार/हातकणंगलेकर, (संपादित), 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६
२१. पाटील/लांजेवार/धनकर, (संपादित), 'समकालीन साहित्य : प्रवृत्ती व प्रवाह', (द. भि. कुळकर्णी अभिनंदन ग्रंथ), विजय प्रकाशन, नागपूर, १९८५
२२. पारगांवकर वि. शं., 'आस्वाद आणि समीक्षा', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८९
२३. फडके ना. सी. 'प्रतिभा साधन', देशमुख आणि कंपनी, पुणे, बारावी आवृत्ती, १९८७
२४. फडके भालचंद्र, 'मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन', श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८०
२५. बापट/गोडबोले, 'मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन, पुणे, तृतियावृत्ती १९७३
२६. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीयावृत्ती १९९६
२७. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरीचा इतिहास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८९
२८. भागवत कमल व इतर, (संपा.) 'स्त्री चळवळीची वाटचाल', प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे, १९८५
२९. मर्ढेकर बा. सी., 'सौंदर्य आणि साहित्य', मौज प्रकाशन, मुंबई, चौथी आ. १९८७
३०. मांडवकर भाऊ, 'गजरा', सेवा प्रकाशन, अमरावती, १९७१

३१. यादव आनंद, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप व समस्या', मेहता पब्लिशिंग, हाऊस, पुणे, १९८५
३२. यादव आनंद, 'मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु. आ. १९९३
३३. लिंबाळे शरणकुमार, संपा. 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह', मधुराज पब्लिकेशन प्रा. लि. पुणे, १९९३
३४. वाळिंबे रा. श., 'साहित्य मीमांसा', चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९५५
३५. सहस्त्रबुद्धे पु. ग., 'स्वभावलेखन', मॉडर्न बूक डेपो, पुणे, १९३८
३६. संत दु. का., 'संशोधन : पद्धती, प्रक्रिया व अंतरंग', पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, दु. आ. १९८८
३७. सारडा शंकर, 'स्त्रीवादी कादंबऱ्या', पुष्प प्रकाशन, पुणे, १९९३
३८. सारंग विलास, 'मराठी नवकादंबरी', (साहित्य विचारमाला, पुष्प १ ले), संपा. म. सु. पाटील, १९९३
३९. सावदेकर आशा, 'पु. भा. भावे साहित्यवेध', साने पब्लिशिंग हाऊस, नागपूर, १९८९
४०. सोमण अंजली, 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८९
४१. हस्तक उषा, 'हरिभाऊंच्या सामाजिक कादंबरीतील व्यक्ती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८
४२. हस्तक उषा, 'कादंबरी आणि मराठी कादंबरी', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९३
४३. क्षीरसागर श्री. के., 'टीका विवेक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दु. आ. १९८०

## नियतकालिके

### विशेष अंक

१. उद्धव शेळके गौरवांक, उद्धव शेळके सत्कार समिती, अमरावती, १९९०
२. जनसाहित्य संमेलन विशेषांक, नागपूर, मार्च १९८४
३. तरुण भारत, नागपूर, दिवाळी अंक, १९८९
४. नागपूर पत्रिका, दिवाळी अंक, १९८४
५. प्रतिष्ठान, औरंगाबाद, कादंबरी समीक्षा विशेषांक, जाने. १९८१
६. महाराष्ट्र दलित साहित्य पत्रिका, ग्रामीण साहित्य विशेषांक, जुलै–डिसेंबर १९८०
७. ललित, मुंबई, दिवाळी अंक, १९९८
८. ललित, मुंबई, दिवाळी अंक, २०००

## मासिके

१. प्रतिष्ठान, औरंगाबाद, नोव्हे./डिसें. १९६४
२. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, जून/डिसेंबर, १९८०
३. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, ऑगस्ट, १९९१
४. ललित, मुंबई, मार्च, १९७७
५. वैजयंती, , जून, १९६२
६. सत्यकथा, , जून, १९६२

## दैनिके

१. दै. जनवाद, नागपूर, दि. १३ मे १९९२
२. दै. नागपूर पत्रिका, नागपूर, दि. २४ डिसेंबर १९९०
३. दै. मराठवाडा, औरंगाबाद, दि. २४ जुलै १९७७
४. दै. लोकमत, नागपूर, २१ जानेवारी २००२
५. दै. सामना, मुंबई, दि. १३ फेब्रुवारी १९८९
६. दै. स्वराज्य, मुंबई–पुणे, दि. २९ मार्च १९८०